ARTHA Poona 4.

अर्थशास्त्र, व्यापार, उद्योगधंदे, बँकिंग, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक

स्थापना : १९३५

# अर्थ

" अर्थ एव प्रधानः " इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : २ आ.
दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3434. Licence No. 53.

वर्ष २१ | पुणें, बुधवार तारीख ५ जानेवारी, १९५५ | अंक १

## विविध माहिती

**१९५३ मधील कापडाचा खप**—१९५३ सालांत अहमदाबादमधील कापड गिरण्यांत तयार झालेलें ८३ कोटी रुपयांवर किंमतीचें कापड विकण्यांत आलें. कापड–गिरण्यांना ४२० लाख रुपयांचा एकूण नफा झाला. त्यापैकीं १६५ लाख रुपये एजंटांच्या कमिशनासाठीं आणि २०० लाख रुपये घसारा म्हणून बाजूला काढून ठेवण्यांत आले. अहमदाबादच्या ६३ गिरण्यांपैकीं ५८ गिरण्यांच्या ताळेबंदावरून हे आंकडे मिळाले आहेत.

**पोस्टाचा ऑडिट रिपोर्ट**—पोस्ट आणि टेलिग्राफ खात्याचा १९५२–५३ सालचा ऑडिट रिपोर्ट लोकसभेला सादर करण्यांत आला. त्यावरून असें दिसतें कीं अहवालाच्या सालीं पोस्ट–खात्यांत एकूण १,१७९ पैशाच्या अफरातफरीचे अगर तत्सम प्रकार झाले. सर्व प्रकारांत मिळून ९,०१,१०५ रुपयांची गफलत झाली. आतांपर्यंत ह्या खात्यांत एका वर्षांत सार्वजनिक पैशाची गफलत झाल्याचा हा सर्वांत अधिक आंकडा आहे.

**कर्नाटकांत कापडाची नवी गिरणी**—कर्नाटकांत नरगुंद ह्या ठिकाणीं सुताची एक नवीन गिरणी चालू करण्यांत आली आहे. ह्या गिरणींत ५,००० चात्या आहेत. गिरणीचें उद्घाटन नवलगुंद येथील स्वामी बसवलिंग ह्यांनीं केलें.

**नवा रेल्वे–रस्ता**—दक्षिण रेल्वेचे इंजिनिअर श्री. गणपति ह्यांच्या अंदाजाप्रमाणें हसन–मंगलोर ह्या नव्या रेल्वे मार्गाच्या बांधणीला ६ कोटी रुपये खर्च येईल आणि तो पूर्ण होण्यास सुमारें ६ वर्षांचा काळ लागेल.

**नवें रेडिओ–केंद्र**—ऑल इंडिआ रेडिओचा विस्तार करण्याच्या नव्या योजनेप्रमाणें त्रावणकोर–कोचीन राज्याच्या उत्तर भागासाठीं २० किलोवॅट शक्तीचें रेडिओ–केंद्र उभारण्यांत येणार असल्याचें समजतें. १९५६ च्या मार्चपर्यंत केंद्राच्या उभारणीचें काम पूर्ण होईल. नवीन केंद्रामुळें राज्यांतील आणखी ७० लाख लोक रेडिओच्या कक्षेंत येतील.

**कोलंबो योजनेचें सभासदत्व**—आग्नेय आशिआची आर्थिक प्रगति घडवून आणण्यासाठीं अंमलांत आणलेल्या कोलंबो योजनेचे सभासद करून घेण्याची विनंति फ्रान्सतर्फे करण्यांत आली आहे. ही विनंति करतांना फ्रान्सचे पंतप्रधान म्हणाले कीं, आग्नेय आशिआंत ब्रिटननें स्वीकारलेल्या धोरणाचेंच अवलंबन करण्याचें फ्रान्सनें ठरविलें आहे.

**फिरोझपूर लाहोर रेल्वेमार्ग**—फिरोझपूर ते लाहोर हा रेल्वे-मार्ग पुन्हा चालू करण्यासंबंधीं वाटाघाटी करण्यासाठीं भारत व पाकिस्तान ह्यांचे संबंधित अधिकारी लवकरच भेटणार आहेत असें समजतें. दिल्ली येथें ह्या बाबींसंबंधीं परिषद भरविण्यांत येणार असून त्यावेळीं चर्चा करण्यांत येणार आहे.

**आशियाच्या मदतीसाठीं पैसे**—आशिआंतील देशांना आर्थिक मदत करण्यासाठीं अमेरिकन सरकार पुढील वर्षासाठीं कॉंग्रेसकडे ४० ते ५० कोटी डॉलर्स रकमेची मागणी करील असा अंदाज करण्यांत आला आहे. ह्याच रकमेंत तांत्रिक मदतीचाहि अंतर्भाव होईल असें दिसतें. त्याशिवाय मदतीच्या चालू कार्यक्रमाप्रमाणें खाजगी भांडवलाला आशिआंत आकर्षित करण्याचेहि प्रयत्न होतील.

**आयुर्वेदाच्या अभ्यासाचें केंद्र**—पदवी परीक्षेनंतरच्या आयुर्वेदाच्या शिक्षणासाठीं जामनगर येथें एक केंद्र लवकरच सुरू करण्यांत येणार आहे, असें समजतें. ही संस्था भारतीय सरकार आणि सौराष्ट्र सरकार ह्यांच्या पुरस्कारानें काढण्यांत येत आहे. मध्यवर्ती सरकारच्या आरोग्य खात्यानें चालू वर्षाच्या अंदाज-पत्रकांत संस्थेसाठीं १ लाख रुपयांची तरतूद केली आहे.

**ताडगुळाचा सहकारी धंदा**—ओरिसाचे गव्हर्नर श्री. कुमारस्वामी राजा ह्यांनीं ताडगुळाचा धंदा वाढीस लागण्यासाठीं सहकारी संस्थांची आवश्यकता आहे, असें मत व्यक्त केलें आहे. ह्या धंद्यामुळें लाखो लोकांना काम मिळेल आणि त्याला भांडवलहि कमी पुरेल, असाहि अभिप्राय त्यांनीं व्यक्त केला. ५० ताडीच्या झाडांपासून १ टन गूळ दरवर्षी तयार होतो असा अंदाज आहे.

**रशिआच्या बलाचा अमेरिकन अंदाज**—रशिआनें अण्वस्त्रांच्या बाबतींत केलेल्या प्रगतीबद्दलचा अमेरिकेचा अंदाज वस्तुस्थितीपेक्षां कमी आहे असें मत मि. हॅरोल्ड युरे ह्या अणुशास्त्रज्ञानें केला आहे. रशिअन लोकांच्या कमी प्रतीच्या रहाणीच्या मानावरून हा अंदाज बांधणें चुकीचें होईल. कारण, रहाणीचें मान उंचावण्याचा रशिआचा निर्णय मुद्दाम घेतलेला असणें शक्य आहे, असेंहि मत त्यांनीं व्यक्त केलें.

**अहमदाबादमध्यें नवे टेलिफोन्स**—अहमदाबाद शहरांत पुढील वर्षी ७०० नवे टेलिफोन्स देण्यांत येतील, असें पोस्ट खात्याच्या एका अधिकाऱ्यानें जाहीर केलें आहे. टेलिफोन्स पुरविण्यासाठीं लागणारें कांहीं साहित्य खात्याच्या हातींहि आलें आहे. अहमदाबाद शहरांत सध्यां ४,४६२ टेलिफोन्स आहेत.

**शास्त्रीय उपकरणांचें प्रदर्शन**—सुप्रसिद्ध शास्त्रज्ञ श्री. सी. व्ही. रमण ह्यांनीं बेळगांव येथें शास्त्रीय उपकरणांच्या व पुस्तकांच्या प्रदर्शनाचें उद्घाटन केलें. ह्या प्रसंगीं बोलतांना ते म्हणाले कीं पांच वर्षांच्या आंत भारतानें आपल्याला लागणारीं सर्व शास्त्रीय उपकरणें देशांतच करण्याचा निश्चय केला पाहिजे. जपानला जर ही गोष्ट साध्य झाली, तर भारताला ती होईलच असा विश्वास त्यांनीं व्यक्त केला.

### ग्रेट ब्रिटनमधील आरोग्याचा ताळेबंद

ग्रेट ब्रिटनच्या आरोग्य खात्याचे प्रमुख अधिकारी, सर जॉन चार्लस, ह्यांनीं आपल्या १९५३ संबंधीं अहवालांत म्हटलें आहे, कीं ब्रिटनची आरोग्यविषयक परिस्थिति समाधानकारक आहे. जिंदगीच्या बाजूस त्यांनीं जननाचें योग्य प्रमाण, क्षयरोगास बळी पडणारांची उतरलेली संख्या, टॉयफाइड तापाचें उच्चाटन व घटसर्पाचा बिमोड, हीं दिलीं आहेत. देणें व कर्ज ह्या बाजूस फुप्फुसाच्या कॅन्सरमध्यें वाढ व मृत अर्भकांच्या जननाचे संबंधांत मंद सुधारणा, ह्या बाबी दिल्या आहेत. म्हाताऱ्या लोकांची संख्या वाढत चालली असल्यामुळें, त्यांच्या औषधपाण्याचा व शुश्रुषेचा प्रश्न उपस्थित होऊं लागला आहे.

### विमानांचें ऐतिहासिक संग्रहालय

ग्रेट ब्रिटनमधील रॉयल एरॉनॉटिकल सोसायटी विमानांचा संग्रहालय स्थापन करण्याच्या प्रयत्नांत आहे. त्यासाठीं वैमानिक खातें, शिक्षण संस्था आणि विमान बनविणारे कारखानदार ह्यांची एक प्रातिनिधिक कमिटी नेमण्यांत आली आहे. हवेंत उड्डाण करण्यास प्रारंभ झाला, तेव्हांपासूनच्या शेंकडो विमानांच्या नमुन्यांची यादी तयार झाली आहे. जर्मन व जपानी विमानांचाहि संग्रहांत समावेश होणार आहे.

### फ्रान्समध्यें दारू पिण्यावर निर्बंध

दारू पिण्यावर नियंत्रण घालण्याचा फ्रेंच सरकारचा प्रयत्न आहे. दुकानांत दारू पिण्याच्या वेळा नियंत्रित करण्यांत येत आहेत. सर्व तऱ्हेच्या दारूचें अल्कोहोलमध्यें मापासाठीं रूपांतर केलें, तर फ्रान्समध्यें अल्कोहोलचा दरसाल दरमाणशीं खप ३०·५ लिटर्स ( ६·५ गॅलन ) इतका आहे. इटलींत तो १४·२, स्वित्झरलंडमध्यें १३, अमेरिकेंत ९·४ व ब्रिटनमध्यें ९·३ लिटर आहे. ह्यावरून, दारू पिण्याच्या बाबतींत फ्रान्सचें अग्रेसरत्व स्पष्ट होईल.


॥ श्री ॥

# दि बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट लि. पुणें २.

" अन्नधान्यावरील नियंत्रण उठवूं नका, जनतेची उपासमार होईल. अन्नधान्याचे भाव भरमसाट वाढतील "
असा विरोध भाड्या भाड्या अर्थशास्त्रज्ञांनीं व विद्वानांनीं केला.

— पण —

★ Lion-Heart पैगंबरवासी किडवईसाहेबांनीं ★

अन्नधान्यावरील नियंत्रण उठविलें, जनतेला खुषी केलें, जनतेची उपासमार झाली नाहीं, अन्नधान्याचे भाव वाढले नाहींत. कमी झाले.

" हजार टनांचा साखर-कारखाना काढणें हें मध्यमवर्गाचें काम नव्हे, हें काम लक्षाधिशांचें आहे. तेव्हां सिंडिकेट लक्षाधिशांच्या स्वाधीन करा अशी ओ-रड " १९४३ ते आजतागाईत Sheep-Heart करीत आहेत.

— परंतु —

**साखरेचा धंदा १० टक्के नफ्याचा तेव्हां बँकेंत तीन वर्षे ३ टक्के व्याजानें रकम ठेवण्यापेक्षा सिंडिकेटला ६ टक्के व्याजानें Lion-Heart मध्यमवर्गानें भांडवल दिलें. हजार टनांची मशिनरी उभी राहून साखरेचें उत्पादन सुरू झालें.**

**चालू हंगामांत अंदाजें ७० लक्ष रुपयांची साखर तयार होईल.**

— सरकारी देणीं, ठेवी, डिव्हिडंड दिलें जाईल —

# - WAIT AND SEE -

— मुदतीच्या ठेवी स्वीकारल्या जातात —

ठेवींचे फॉर्म सिंडिकेटच्या पुणें येथील मुख्य कचेरींत मिळतील.

कॉमनवेल्थ बिल्डिंग,
९८० सदाशिव पेठ, लक्ष्मीरोड, पुणें २.
दि. २९ डिसेंबर १९५४

चंद्रशेखर गोविंद आगाशे,
मॅनेजिंग एजंट्स.

# अर्थ

बुधवार, ता. ५ जानेवारी, १९५५





संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे

संपादक :
श्रीपाद वामन काळे


## चेकच्या पाठीवरील सही आवश्यक असावी काय?

### चेकबाबत सुचविलेली सुधारणा

चेकच्या पाठीमागील सहीबाबत (एंडॉर्समेंट) पद्धति सोपी करून बँकांचा व चेक वापरणारांचा वेळ वांचविण्याची तोड मि. ग्रॅहॅम पेज नांवाच्या, ब्रिटिश पार्लमेंटाच्या एका सभासदास सुचली आहे व ते त्यासंबंधांत एक बिल पार्लमेंटांत आणणार आहेत. ज्याच्या नांवानें चेक काढला असेल (पेयी) त्याच्याच खात्यांत चेकचे पैसे जमा व्हावयाचे असतील, तर चेकचे पाठीवर एंडॉर्समेंटची आवश्यकता नाहीं, अशी दुरुस्ती ते घडवून आणूं इच्छितात. एंडॉर्समेंट अनावश्यक ठरवावी, अशाबाबत प्रयत्न कित्येक वर्षे चालू आहेत, त्यांस मि. पेज ह्यांनीं पुनः चालना दिली आहे.

एंडॉर्समेंटमुळें बँका व फर्म्स ह्या दोघांना बरेंच काम पडतें. चेकच्या पृष्ठभागावरील नांवाप्रमाणेंच हुबेहूब (तें नांव चुकलें असलें तरी) एंडॉर्समेंट करावी लागते. ज्या बँकेंत चेक भरले जातात, त्या बँकेला चेक वसुलीसाठीं पाठविण्यापूर्वी एंडॉर्समेंट तपासून पहावी लागते. क्लिअरिंगमधून आलेले चेक, ज्या बँकेवर ते काढलेले असतात ती बँक पुनः तपासून पहाते. कोणती एंडॉर्समेंट बरोबर आणि कोणती चूक, ह्याबाबत बरेच नियम आहेत; आणि कलेक्टिंग बँकरच्या तपासणींतून चुकीची एंडॉर्समेंट निसटली, तर ज्या बँकेवर चेक काढला असेल ती बँक तो चेक परत धाडते आणि एंडॉर्समेंट दुरुस्त होईपर्यंत चेकचे पैसे दिले जात नाहींत.

एंडॉर्समेंट आवश्यक असणाऱ्या चेक्सची संख्या कितीतरी मोठी असते आणि ह्या एंडॉर्समेंटस, चेकची वसुली व पैसे देणें ह्या व्यवहारांत, दोनदां तपासल्या जातात. त्यापैकीं कित्येक चेक चुकीच्या एंडॉर्समेंटमुळें नापास केले जातात, कित्येक एंडॉर्समेंटसना बँकांचें 'कन्फर्मेशन' लागतें, तर कित्येक एंडॉर्समेंटस आगाऊ खास व्यवस्थेप्रमाणें बँका करतात.

तिऱ्हाइताच्या नांवानें चेक वर्ग केलेला नसेल आणि 'पेयी'नें तो स्वतःच्या खात्यांतच भरला असेल, तर चेकवर एंडॉर्समेंट असण्याची आवश्यकता आहे, कां नाहीं, ह्या मुद्यावरच मि. पेज ह्यांच्या बिलाचें भवितव्य अवलंबून आहे. एंडॉर्समेंट हा 'निगोशिएशन'चा एक भाग आहे आणि ह्याविषयक कायदा बिल ऑफ एक्सचेंजच्या कायद्यापासून निघालेला आहे. 'अ'नें 'ब'ला चेक द्यावयाचा, तर 'ब'ला त्या चेकचा मालकी हक्क मिळवून दिला पाहिजे; म्हणून एंडॉर्समेंट आवश्यक आहे. 'ब' हि एंडॉर्समेंट करून तो 'क' ला देऊं शकतो. चेक निगोशिएबल इन्स्ट्रुमेंटचा एक प्रकार असला, तरी प्रत्यक्ष व्यवहारांत फारच थोडे चेक एंडॉर्समेंटच्या द्वारां एकमेकांना दिले जातात. ज्यांचें बँकेंत खातें नाहीं, ते मात्र दुसऱ्याकडून चेक वटवून घेतात.

जे चेक "पेयी" च्या खात्यांतच जमा केले जातात, त्यांच्या बाबतींत "निगोशिअशन" चा प्रश्नच उपस्थित होत नाहीं. प्रत्यक्ष पैसे देणाऱ्या बँकेकडे चेक आला, म्हणजे ती बँक खातेदाराच्या सूचनाप्रमाणें पैसे दिले जात आहेत ना हें पहाण्यासाठीं एंडॉर्समेंट तपासते. चेकच्या मुखपृष्ठाप्रमाणें एंडॉर्समेंट असली, म्हणजे तिला पुरतें; सही ही प्रत्यक्ष 'पेयी'चीच आहे, हें समजण्यास तिला मार्ग नसतो. कलेक्टिंग बँकरच्या नेहेमींच्या खातेदाराची सही असेल, तरच तो तिला ओळखूं शकणार; पण त्यानें दुसऱ्यासाठीं चेक वटवला असेल तर मुखपृष्ठाप्रमाणें सही आहे कीं नाहीं ह्यापेक्षा त्याला ज्यास्त कळणें शक्य नाहीं.

एंडॉर्समेंटचा, अशा रीतीनें, बँकांना कायदेशीर संरक्षण देण्याकडे उपयोग होतो; चेक काढणाराची कल्पना असते त्याप्रमाणें त्याचें संरक्षण होत नाहीं. सहाजीकच, सध्यांच्या कायद्यांतील कोठल्याहि बदलाकडे ग्रेटब्रिटनमधील बँकर्स विशेष लक्षपूर्वक पहातील, हें उघड आहे. बँकांना त्यांचें संरक्षण नाहींसें न होता सोय झाली तर हवी आहे. ह्यासंबंधांतील प्रत्यक्ष सुधारणा व त्यांतील अडचणी, हा तपशीलाचा प्रश्न आहे.

मि. पेज ह्यांची योजना थोडक्यांत अशी आहे. कलेक्टिंग बँकर आजाहि जी गोष्ट करीत असतो, त्याच गोष्टीस 'एंडॉर्समेंट' मानल्यानें काम सोपें होणार आहे. चेक बँकरचे नांवें 'स्पेशल' क्रॉस करणें, ही ती गोष्ट होय. खातेदारानें स्वतःच चेक भरण्यापूर्वी बँकेचें नांव लिहून 'क्रॉसिंग' केलें, म्हणजे झालें. दुसऱ्याच्या नांवें जे चेक वर्ग केले जात नाहींत त्यांच्या एंडॉर्समेंटसंबंधीं घ्यावा लागणारा त्रास त्यामुळें वांचेल; पण त्याबरोबरच एंडॉर्समेंटचें कायदेशीर संरक्षण मात्र कायम राहील.

बँकांनीं ह्या सुधारणेचें सर्वसाधारणपणें स्वागत केलें आहे, हें स्वाभाविकच आहे. ग्रेटब्रिटनमध्यें, १०० पैकीं ९७ चेक 'पेयी' आपल्या स्वतःच्या खात्यांत भरतात, त्यामुळें एकूण चेक्सपैकीं इतक्या बहुसंख्य चेक्सच्या बाबतींत एंडॉर्समेंटबाबत त्रास वांचला तर बँकांचें काम पुष्कळ सुलभ होईल. बँकांतील काम वांचलें तरी त्यांचा पगारखर्च बराच वांचेल, असें मात्र नाहीं. कांहीं थोड्या मोठ्या बँकांचा खर्च वाचेलहि; पण निदान कामाचा बोजा कमी होईल एवढें मात्र निश्चित. पेयींच्या खात्यामार्फत चेक गेला म्हणजे रक्कम पोंचल्याची ती पावती होय, वेगळी पावती घेण्याचें कारण नाहीं, असें फर्म्स मानतात. ही पद्धति सार्वत्रिक झाली, म्हणजे वेळाची व पैशाची जी बचत होईल, ती एंडॉर्समेंटबाबत नियमांतील सुधारणेमुळें होणाऱ्या बचतीपेक्षाहि जास्त ठरेल, हें उघड आहे; पण कित्येक फर्म्सचा आग्रह आहे, कीं बँकेमार्फत एंडॉर्समेंटची तपासणी होते ती आवश्यकच आहे; विमाकंपन्या क्लेमचे पैसे देतात, त्यांना हें संरक्षण हवें आहे. "चेक एंडॉर्स केलेला आहे, अशी 'कायदेशीर' कल्पना निर्माण केली, म्हणजे 'पेयी'ला चेकचे पैसे मिळाल्याचा तो पुरावा समजला जाईल" अशी तरतूद झाली, म्हणजे व्यापारी फर्म्सचा आक्षेप दूर होईल, असें मि. पेज ह्यांचें म्हणणें आहे. पण कित्येक फर्म्सचें तेवढ्यानें समाधान होणार

नाहीं, असें दिसतें. कांहीं झालें तरी मि. पेज ह्यांचा हेतु स्तुत्य असून, तो साध्य होण्याच्या मार्गातील अडचणींचें निराकरण होणें जरूरीचें आहे. चेकवरील नांवाबरहुकूम सुध्दा, स्पष्ट अक्षरांत 'सही' केल्यानें बँकांना आज कायदेशीर संरक्षण मिळतें; तशी एंडॉर्समेंट त्यांना पुरते; मि. पेज ह्यांनीं सुचविलेली एंडॉर्समेंट ( बँकरच्या नांवें स्पेशल क्रॉसिंग ) त्यापेक्षा ज्यास्त खरी समजली जाण्यास अडचण पडूं नये. कोणताहि बदल होण्यापूर्वी, त्याच्या साधकबाधक परिणामांची चर्चा झाली पाहिजे, हें उघड आहे.

## बचत करणारे नवे ठेवीदार हवेत

बचत करणारांची संख्या २० लाखांनीं वाढविण्याची मोहीम लंडन येथें ड्यूक ऑफ एडिंबरो ह्यांनीं नुकतीच सुरू केली. तिचा उद्देश नवी बचत आकर्षण्यापेक्षां नवे बचत करणारे आकर्षिणें, असा आहे. बचत करणारेच वाढले म्हणजे त्यांची एकूण बचतहि वाढेल, अशी अपेक्षा आहे. नेहमीं जेव्हां बचतीच्या मोहिमा आखण्यांत येतात, तेव्हां नवीन पैसा जमा न होतां एका ठिकाणची बचत दुसरीकडे ओढली जाते एवढेंच. अल्प मुदतीच्या ठेवींचें दीर्घ मुदतीच्या कर्जरोख्यांत रूपांतर होणें, तात्कालिक बचतींमधून दीर्घकालीन बचत निर्माण होणें, इत्यादि तात्कालिक उद्दिष्टें साध्य झालीं तरी बचतीचा पाया रुंदावला जात नाहीं; एकूण बचतीच्या मानानें बचत करणारांची संख्या तशीच कायम रहाते. बँकांकडील ठेवींत होणारी वाढ व सरकारला मिळणारीं कर्जें ह्यांची छाननी केली, तर जुने लोकच अधिकाधिक रक्कम बाजूला काढून देतात; बचतीला प्रारंभ करणारे नवे लोक त्यांत सामील होत नाहींत. बचत करणारे लोक वाढले तर प्रत्येकाच्या सध्यांच्या सरासरी बचतींत थोडी घट झाली तरी त्याचे दुष्परिणाम जाणवणार नाहींत.

नॅशनल सेव्हिंग्ज कमिटीच्या, नव्या बचतदाराची व्याख्या "जो सेव्हिंग्ज सर्टिफिकेट नव्यानें घेतो, जो ३½% डिफेन्स बाँडस प्रथमच खरेदी करतो, जो पोस्टऑफिस सेव्हिंग्ज बँकेंत किंवा ट्रस्टी सेव्हिंग्ज बँकेंत नवें खातें उघडतो" अशी आहे. जो घरांत कांहीं नोटा साठवून ठेवतो किंवा स्वतःच्या बँक खात्यांत नव्या रकमा भरतो, तो वरील व्याख्येंत येत नाहीं. ह्यांपैकींहि कांहीं लोक कमिटीच्या व्याख्येप्रमाणें एकादें सर्टिफिकेट घेऊन नवे बचतदार बनतील; पण असे लोक फार असणार नाहींत. कमिटीनें नवे बचतदार आकर्षण्याच्या योजनेबरोबरच, जुन्यांनाहि बचत वाढविण्यास उद्युक्त करण्याच्या योजना आखल्या आहेत. सेव्हिंग्ज सर्टिफिकेटांत गुंतविण्याच्या कमाल मर्यादेंत वाढ करणें, ट्रस्टी सेव्हिंग्ज बँकेंतील कमाल ठेवींत वाढ करून व इतर मार्गांनीं हें साधण्यांत आलें आहे. तथापि, सेव्हिंग्ज बँकांतील ठेवींच्या मार्गेच नवी बचत जमा होते असा अनुभव आहे.

भारतांतील बचतमोहिमांनीं नवे बचतदार हुडकून काढून त्यांना बचतीची चटक लावण्याचा प्रयत्न करणें अगत्याचें आहे सरकारप्रमाणें बँकांनींहि ह्या बाबतींत पाऊल टाकण्यास हरकत नाहीं.

( श्री. वा. काळे : "सह्याद्रि", जाने. १९५५ )

**गाड्या जोडण्यासाठी राडरचा उपयोग**—अमेरिकेंतील एका मोठ्या रेल्वे स्टेशनावर गाड्या जोडण्यासाठी व तोडण्यासाठी विजेच्या मेंदूचा व राडरचा उपयोग करण्यांत येत आहे. ही संयुक्त रचना २४ तासांत ४,००० डबे हाताळूं शकते.

## भारत-अमेरिका व्यापाराची वृद्धि

न्यूयॉर्क येथील एक्सपोर्ट ॲडव्हरटाइजिंग असोसिएशनचे अध्यक्ष मि. पॉल कुमिंग ह्यांचें मुंबई येथें नुकतेंच एक व्याख्यान झालें. भारतामधील धंदेवाले आणि अमेरिकेमधील धंदेवाले ह्यांनीं परस्परांच्या देशाला अधिक व नियमित भेटी द्याव्या; म्हणजे उभयतां देशांत अधिक समजूत उत्पन्न होईल असा विश्वास त्यांनीं व्यक्त केला. ॲडव्हरटायजिंग असोसिएशन ऑफ इंडिया ह्या संस्थेच्या सभासदांसमोर बोलतांना ते म्हणाले, कीं ब्रिटन आणि अमेरिका ह्या देशांतील उद्योगपती व व्यावसायिक एकमेकांच्या देशांना वारंवार भेटी देत असत आणि अशा गांठीभेटींमुळें उभयतां देशांतील व्यापार मोठ्या प्रमाणावर वाढला असा अनुभव आहे. भारत व ब्रिटन ह्यांच्यांतील व्यापाराची वृद्धि ह्या मार्गानें होणें शक्य आहे. भारत आज एक मोठें राष्ट्र होण्याच्या उंबरठ्यावर आहे. भारतामधील कापडाला परदेशांत फार मोठा वाव आहे. आग्नेय आशिआंतील राष्ट्रांना कापड पुरविणारें एक मोठें केंद्र म्हणून भारतांत कापडाचा धंदा वाढीस लागल्यास त्यांत आश्चर्य वाटण्यासारखें कांहीं होणार नाहीं. ह्या धंद्यांत जपाननें मोठी आघाडी मारलेली आहे, हें मात्र लक्षांत ठेवलें पाहिजे. भारतीय सरकारनें आर्थिक विकासाचे जे कार्यक्रम आखले आहेत त्यामुळें भारतीय जनतेची खरेदीची शक्ति बऱ्याच प्रमाणांत वाढेल ह्याविषयीं शंका नाहीं. भारतामधील जाहिरातींच्या व्यवसायासंबंधीं बोलतांना ते म्हणाले, कीं प्रत्येक प्रगतिशील देशांत जाहिरातींच्या संस्था असतात आणि त्या देशांतील उद्योगधंदा वाढविण्यास चांगली मदत करतात. भारतांतहि ह्या धंद्याला चांगला वाव आहे. तथापि जाहिरातींच्या संस्थांनीं नवीन कल्पना काढून उत्पादकांना व व्यापाऱ्यांना साह्य केलें पाहिजे.

## खनिज संपत्तीसंबंधी अहवाल

आशिआ व अतिपूर्वेमधील देशांतील खनिज संपत्तीसंबंधी अलीकडे ज्या घडामोडी झाल्या आहेत त्यांचा आढावा घेणारा अहवाल आशिआ व अतिपूर्वविषयक आर्थिक मंडळानें प्रसिद्ध केला आहे. अहवालांत भारतामधील खनिज-संपत्तीच्या विकासासंबंधीं बरीच माहिती देण्यांत आली आहे. भारतांत खनिजांच्या विकासाविषयीं अधिकाधिक लक्ष देण्यांत येत असून त्या कामासाठीं एक सल्लागार मंडळ नेमल्याचें नमूद करण्यांत आलें आहे. भारताच्या खनिज-संपत्तीसंबंधीं माहिती देतांना अहवालांत असें म्हटलें आहे कीं ज्या खनिजांचा उपयोग अणुशक्तीच्या निर्मितीसाठीं होण्यासारखा आहे, अशा खनिजांवर सरकारनें १९५३ सालीं आपला ताबा बसविला आहे. त्याशिवाय १९४८ सालीं जो अणुशक्तीविषयक कायदा करण्यांत आला त्यांतील कलमांप्रमाणें कांहीं विशिष्ट खनिजांच्या वापरावरील नियंत्रणहि सरकारनें आपल्याकडे घेतलें आहे. नवीन खनिज-संपत्तीचा शोध लावण्याच्या कामाकडेहि अधिक लक्ष देण्यांत येत आहे. ब्रह्मपुत्रा नदीच्या खोऱ्यांत तेल सांपडतें किंवा काय हें पहाण्यासाठीं आसामची पहाणी करण्याचें काम लवकरच सुरू करण्यांत येणार आहे. ह्या भूस्तरविषयक पहाणीसाठीं अद्ययावत् साधनें वापरण्यांत येतील. तेलाच्या शोधासाठीं भारतांत इतक्या कसोशीनें करण्यांत येणारी ही पहिलीच तपासणी असावी. १९४८ सालापेक्षा १९५३ सालीं भारतानें कमी किंमतीचीं खनिजें निर्यात केलीं. भारतामधून मँगेनीज, कोळसा, अभ्रक, इलमेनाइट, लोखंडाची माती, क्रोमाइट, इत्यादि खनिजें निर्यात होतात. पण तेल, गंधक व इतर कांहीं खनिजें ह्यांच्या बाबतींत मात्र भारत परदेशांवर अवलंबून आहे.

# दि बेळगांव बँक लि., बेळगांव

## रौप्य महोत्सव समारंभाचा वृत्तांत

या समारंभाकरितां बँकेच्या इमारतीसमोर भव्य मंडप घालण्यांत येऊन विजेची रोषणाई केली होती. व्यापताकांनीं सभागृह सुशोभित करण्यांत आलें होतें. समारंभासाठीं अंदाजें तीन हजार समुदाय उपस्थित होता. त्यांत बँकेच्या शाखांच्या ठिकाणाहून बरेच हितचिंतक मुद्दाम आले होते. समारंभाची सुरवात उत्साहपूर्ण अशा वातावरणांत ईशस्तवनानें झाली.

कुमारी किशोरी सराफ ह्यांनीं "लक्ष्मी कौस्तुभ पारिजातक सुरा" ही चतुर्दश रत्नांची मंगलमाला व 'परम विमला' हें पद पटदीप रागांत सुस्वर व सुरेल आवाजांत गाऊन दाखविलें. त्यानंतर बोर्डातर्फे डायरेक्टर, श्री गोविंदराव सराफ ह्यांनीं स्वागतपर भाषण करून बँकेची प्रगति कशी होत गेली, ह्यासंबंधीचें विवेचन केलें.

### श्री. सराफ यांचें भाषण

"बेळगांव बँकेची स्थापना जानेवारी, १९३० मध्यें झाली. बेळगांव शहर हें कारवार, गोवा आणि वेंगुर्ले ह्या व्यापारी पेठांच्या वाटेचे तोंडाशींच असून तेथें बँकिंगच्या सोईची गरज पूर्वीपासून भासत होती. परंतु मुंबई व इतर ठिकाणच्या कांहीं बँका बुडाल्या होत्या त्यामुळें नव्या संस्थांच्या स्थापनेस वातावरण अनुकूल नव्हतें. व्यापाराची गरज सहकारी बँकिंग भागवूं शकत नव्हतें. इंपीरिअल बँकेनें बेळगांव येथें १९२७ मध्यें एक पे ऑफिस उघडलें, परंतु स्थानिक व्यापाऱ्यांच्या गरजा भागविण्यास तें समर्थ नव्हतें. व्यापारी वृत्तीच्या स्थानिक बँकेची आवश्यकता तीव्रतेनें भासत होती. कै. श्री. के. आर. पणजीकर प्रभृति सेवानिवृत्त वरिष्ठ रेव्हेन्यु अधिकाऱ्यांना बेळगांव येथें पेन्शन घेऊन स्थाइक होतांना समाजसेवेची ही संधीच वाटली. त्यांचेबरोबर आजचे चेअरमन श्री. जी. एल. गजेंद्रगडकर व त्यांचे सहकारी कै. श्री. किणी व श्री. नेसरीकर हेहि होते.

"श्री. किणी ह्यांच्या अध्यक्षतेखालीं ११-१-१९३० रोजीं १२,०००· रुपयांच्या भांडवलानें एका लहानशा भाड्याच्या जागेंत बँक सुरू झाली. बँकेची हळुहळु प्रगति होत गेली. १९३९ पर्यंत श्री. एस. एन. सामंत हे मॅनेजिंग एजंट होते. १९४० हें वर्ष बँकेच्या इतिहासांत बरेंच गाजलें. मतभेद, राजीनामे, इत्यादींमुळें जनतेपैकीं कांहीं जणांत किंतू निर्माण झाले. पण बोर्डानें आत्मविश्वासानें परिस्थिति आटोक्यांत आणली व निष्ठावंत आणि लायक अशा तरुणांना बोर्डावर घेऊन त्यास बळकटी आणली. ह्याच वर्षी श्री. गो. वि. सराफ व श्री. ए. आर. नाईक हे बोर्डावर आले. त्यावेळीं बँकेचें वसूल भांडवल ६० हजार रु. व खेळतें भांडवल ६ लक्ष रु. होतें.

"युद्धास प्रारंभ झाल्यानंतर बँकेची प्रगति झपाट्यानें होत गेली व शाखांचा विस्तारहि होत गेला. बँकेच्या आतां २३ शाखा असून त्या एकमेकांना पोषक व्हाव्यात अशाच रीतीनें स्थापन केलेल्या आहेत. ५,००० ते १५,००० लोकवस्तीच्या ठिकाणींच ह्या शाखा उघडण्यांत आलेल्या आहेत; पुरेशा बँकिंगच्या सोई असलेल्या मोठ्या शहरांत शाखा उघडण्याचें बोर्डानें कटाक्षानें टाळलें आहे.

"बँकेच्या वाढीबरोबर तिचें शेअर भांडवलहि वाढवत न्यावें लागलें, व तें आतां ६ लक्ष रु. झालें आहे. शेअर कोणालाहि घेतां यावा, ह्यासाठीं त्याची किंमत अवघी १० रु. ठेवण्यांत आली आहे. मागाहून विक्रीस काढलेलें भांडवल २०% वाढाव्यानें खपलें आहे, ही गोष्ट नमूद करण्यास मला अभिमान वाटतो. भांडवल वाढलें तरी १९५२ अखेर ६३/४% डिव्हिडंडचा दर कायम राखलेला आहे. नोकरवर्गास वेळोवेळ योग्य पगारवाढ देण्यांत आलेली आहे. रिझर्व्ह बँकेच्या रिपोर्टाप्रमाणें, बँकांच्या ठेवींत साधारणतः घट होत असतांना, आपल्या बँकेकडील ठेवींत सतत वाढ होत गेली आहे; आतां बँकेकडे ९८,००,००० रुपयांच्या ठेवी असून खेळतें भांडवल १,२०,००,००० रु. झालें आहे.

"१९४८ सालीं बँकेस शेड्यूल्ड बँकेचा दर्जा प्राप्त झाला. बँकेच्या वाढत्या व्यापास भाड्याची लहान जागा अपुरी पडूं लागली व स्वतःच्या इमारतीच्या पायाचा दगड २६-३-१९५२ रोजीं बसविण्यांत आला. १०-४-१९५३ रोजीं इमारतीचें काम पुरें झालें. तिला एकूण १,९५,००० रु. खर्च आला.

"१९४६ मध्यें श्री. ए. आर. नाईक ह्यांस मॅनेजिंग डायरेक्टर नेमण्यांत आलें. त्यांच्या दक्ष व तज्ज्ञ देखरेखीस मॅनेजर श्री. एच. एस. कुलकर्णी ह्यांच्या उत्साही व कार्यक्षम सहकार्याची जोड मिळाल्यामुळें बोर्डाचें सावधगिरीचें धोरण प्रत्यक्षांत उतरूं शकलें आणि बँकेची व तिच्या शाखांची लोकप्रियता वाढूं शकली.

"एका कोटीवर खेळतें भांडवल, तीन मजली इमारत, सुसज्ज सेफ डिपॉझिट व्हॉल्ट, पांच जिल्ह्यांत पसरलेलें शाखांचें जाळें, आणि सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे आमच्या गिऱ्हाइकांचा वाढता विश्वास, ह्यांची मोठ्या शहरांतील मोठ्या बँकांशीं तुलना कदाचित् होणार नाहीं. पण आमच्या मर्यादित कार्यक्षेत्रांत आम्हीं भरभक्कम पायावरील बँकिंगच्या वाढीस भरपूर हातभार लावलेला आहे, अशी आमची मनोदेवता सांगते. आम्हीं ज्या गोष्टी केव्हांच दूरदृष्टीनें केल्या, त्यांची गरज रूरल बँकिंग चौकशी कमिटीनें १९५० सालीं प्रतिपादन केली, ह्यावरून आपल्या बँकेचें पुरोगामित्व स्पष्ट होईल. सामान्य माणसाची बँकिंगची सेवा करून आम्हीं बँकिंगच्या व्यवसायाचा पाया मजबूत करण्याचा प्रयत्न केला आहे. ठेवीदार आणि भागीदार ह्यांच्या हितास बोर्डानें नेहमींच प्राधान्य दिलें आहे.

"आपल्या देशाच्या आर्थिक उद्धारांत बँकांना महत्त्वाची कामगिरी करावयाची आहे. ह्या बाबतींत आम्हांस जगन्नियंत्यानें योग्य बुद्धि द्यावी व मार्गदर्शन करावें, एवढीच आमची त्याला प्रार्थना आहे."

श्री. सराफ ह्यांनीं शेवटीं बँकेच्या हितचिंतकांचे व साहाय्यकांचे यथोचित आभार मानले. स्थानिक बँकांच्या विशिष्ट परिस्थितीकडे व त्यांच्या प्रश्नांकडे त्यांनीं लक्ष वेधलें आणि संस्थेची कार्यक्षमता व सुरक्षिता अबाधित असेल तर तिला जनतेची सेवा करण्याची संधि पुरेपूर मिळाली पाहिजे, असा आपल्या भाषणाचा समारोप केला.

त्यानंतर अध्यक्ष डॉ. काटजू ह्यांना व सन्मान्य पाहुणे, उपमंत्री श्री. बी. एन. दातार, यांना पुष्पहार अर्पण करण्यांत आले. बँकेचे मॅनेजर श्री. एच. एस. कुलकर्णी, ह्यांनीं समारंभाकरितां आलेले शुभसंदेश वाचून दाखविले. त्यांत सर एच्. पी.

मोदी, शेठ प्राणलाल देवकरण नानजी, श्री. भाऊसाहेब हिरे, श्री. बी. डी. जत्ती, डेक्कन बँकस असोसिएशन, पूना बँकिंग असोसिएशन, इंपीरियल बँक ऑफ इंडिया, मुंबई इत्यादींचे संदेश होते. त्यानंतर अध्यक्ष डॉ. कैलासनाथ काटजू यांचे भाषणास सुरवात झाली.

## डॉ. काटजू यांचें भाषण

"बारा हजार रुपयांच्या अल्प भांडवलावर बँक पंचवीस वर्षांपूर्वी सुरू करून आज सव्वा कोट रुपयांपर्यंत आपली एकूण जिंदगी आपण वाढविली आहे, ह्यावरून आपली कार्यपद्धति चांगली असल्याचें व आपण जनतेचा सोळ विश्वास संपादन केल्याचें स्पष्ट होत आहे. आजच्या समारंभाच्या प्रसंगीं मी आपलें अभिनंदन करतों व या प्रसंगीं मला आपण आमंत्रण दिल्याबद्दल धन्यवाद देतों. विशेषतः आपण केवळ आपल्या शहरापुरतीच दृष्टि न ठेवतां कर्नाटक व महाराष्ट्र यांतील पांच जिल्ह्यांतील लहान लहान गांवांच्या ठिकाणीं शाखाविस्तार करून जनतेस बँकिंगची सोय उपलब्ध करून दिल्याबद्दल मला विशेष आनंद होत आहे. सरकारनेंहि आतां इंपीरियल बँक ही स्टेट बँक करून देशांतील अंतर्गत भागांत बँकिंगचा प्रसार करण्याचें धोरण जाहीर केलेंच आहे. बँका ह्या कमी व्याजानें लोकांकडील ठेवी जमा करून थोड्या जास्त व्याजानें गरजू व्यापाऱ्यांची कर्जाची सोय करीत असतात. यामध्यें एकप्रकारची समाजसेवाच बँक करीत असते. मात्र त्यांत प्रामाणिकपणा व दक्षता पाहिजे. गेल्या वर्षांत बँकिंग निवाड्यासंबंधीं बराच गाजावाजा झाला व आतां अखेर सरकारनें न्यायमूर्ति राजाध्यक्ष यांच्याकडे ही बाब चौकशी करण्याकरितां सोंपविलेली आहे. त्याचा निर्णय समाधानकारक लागेल असें मी समजतों. आपल्या कार्याबद्दल पुन्हां एकदां अभिनंदन करून मी आपली रजा घेतों."

नंतर चेअरमन, श्री. गजेंद्रगडकर यांनीं पाहुण्यांचे व सर्वांचे आभार मानले व "वंदे मातरम्" होऊन फोटो व अल्पोपहार झाल्यावर समारंभाचें काम संपलें.

## दि बेळगांव बँक लि.

( शेड्यूल्ड बँक )

भांडवल, गंगाजळी, इनव्हेस्टमेंट्स, ठेवी, रोख, इत्यादींचे २४-१२-१९५४ रोजींचे आंकडे

| | |
|---|---|
| १ वसूल भांडवल | ६,००,००० |
| २ रिझर्व्हज् | २,२०,००० |
| ३ एकूण ठेवी | ९७,१२,००० |
| ४ सरकारी रोख्यांत गुंतवणूक | २८,०५,००० |
| ५ मोठ्या बँकांत मुदती ठेवी | १३,००,००० |
| ६ हातांत रोख | १०,३८,००० |
| ७ इतर बँकांत, चालू खात्यावर | १२,५८,००० |
| ८ कॉल व शॉर्ट नोटिस मनी | २,००,००० |
| ९ दिलेलीं कर्जें ( बिलें धरून ) | ४०,७८,००० |
| १० खेळतें भांडवल | १,२०,००,००० |

**इजिप्त जेट विमानें बांधणार**—१९५५ अखेर इजिप्तमध्यें जेट विमानें बांधलीं जातील अशी माहिती इजिप्तच्या एका मंत्र्यानें जाहीर केली आहे. जेट विमानें तयार करणारीं राष्ट्रें जगांत सध्या फक्त १० च आहेत असें समजतें. लहान-सहान लष्करी साहित्य व त्यासाठी लागणारा दारू गोळाहि इजिप्त स्वतःसाठी तयार करूं शकेल असें ते म्हणाले.

मेधा, मुरुता आणि सौजन्याचे प्रतीक
१९१८
सारस्वत
को-ऑपरेटिव्ह बँक
लिमिटेड.
अधिकृत भांडवल रु. १०,००,०००
वसूल झालेलें भांडवल रु. ७,२०,३००
रिझर्व रु. ६,०६,०००
ठेवी रु. १,=२ ... .०००
बँकेचे सर्व व्यवहार केले जातात.

## इं. फि. कॉर्पोरेशनचा कारभार

सा. न. वि. वि.

"अर्थ" च्या २२-१२-५४च्या अंकलेखांत इं. फि. कॉर्पोरेशनच्या अध्यक्षांचे विचार, त्यापुढील मजकूर व "सद्बुद्धीनें केलेल्या गोष्टी" असा गौरवपूर्वक उल्लेख पाहून समाधान वाटलें. कॉर्पोरेशनचें आतांपर्यंतचें काम अत्यंत कार्यक्षमतेनें, व्यापारी पद्धतीनें चाललें आहे आणि त्याचें श्रेय तिचे मॅ. डायरेक्टर श्री. व्ही. आर. सोनाळकर यांना आहे. ऑडिट रिपोर्टांत त्यांच्या कामाबद्दल प्रशंसेचा एक शब्दहि न लिहितां निव्वळ चुकांची—दोषांची (?) शोधून यादी देत बसणें एकमार्गी अन् अन्यायाचें वाटतें. या सर्व टीकास्त्राचा अखेर परिणाम कॉर्पोरेशन सरकारी पद्धतीनें, जबाबदारी न घेतां कार्य करण्यांत होणार, हें स्पष्ट दिसत आहे.

आपला

एक अनुभवी बँकर.

## पुणें अ. वि. गृहाची महाराष्ट्र रोजनिशी

पुणें अ. वि. गृहाची महाराष्ट्र रोजनिशी तयार झाली असून ती विकत घेतल्यानें किंमतीचा भरपूर मोबदला मिळणार आहे. सरकारी सुट्या, महत्त्वाचे धार्मिक सण, उपनयन व विवाह-मुहूर्त, पोस्ट व तारेची उपयुक्त माहिती, कोर्टासंबंधीं सामान्य माहिती, रेल्वेसंबंधीं माहिती व नियम, इत्यादि गोष्टींमुळें रोजनिशीची उपयुक्तता वाढली आहे. हुशार व गरीब विद्यार्थ्यांचें पालनपोषण व शिक्षण ही संस्था कसोशीनें करीत आहे व संस्थेंतून बाहेर पडणारे विद्यार्थी महाराष्ट्राच्या उद्धारास हातभार लावीत आहेत. म्हणून, संस्थेला कोणत्याहि प्रकारें मदत करणें नागरिकांचें कर्तव्यच ठरतें. संस्थेच्या गरजा मोठ्या आहेत, पण प्रत्येक पैचा व कणाचा अगत्यानें व आभारपूर्वक स्वीकार केला जातो; तेव्हां प्रत्येकजण संस्थेला यथाशक्ती साहाय्य करूं शकतो व तसें त्यानें अवश्य करावें.

## क्रेडिट कॉर्पोरेशनला जागतिक बँकेचें कर्ज

स्थापन होऊं घातलेल्या इंडस्ट्रिअल क्रेडिट अँड इनव्हेस्टमेंट कॉर्पोरेशन ऑफ इंडियाला जागतिक बँकेनें १ कोटी डॉलर्स कर्ज देण्याचें मान्य केलें आहे. गेल्या महिन्यांत कॉर्पोरेशनची स्थापना झाली, म्हणजे त्याबाबत करार केले जातील. कर्जाला भारत सरकारची हमी असून तें १५ वर्षांत फेडावयाचें आहे. व्याजाचा दर ४½% राहील व परतफेड १ जानेवारी, १९६० पासून सुरू होईल.

## अमेरिकन अर्थव्यवस्थेंत सहकारी संस्थांचें महत्त्वाचें स्थान

स्वतंत्र राष्ट्रांतील शेतकऱ्यांना शेतीच्या सहकारी संस्थांचा फार उपयोग होतो. स्वयंस्फूर्तीनें स्थापन झालेल्या त्या संघटनांमुळें शेतकऱ्यांना आपला माल बाजारपेठेंत विकणें सोपें होतें आणि जरूरीच्या वस्तू व आउतें काटकसरीनें व त्रासाशिवाय विकत घेण्याची सोय होते.

" कलेक्टिव्ह " या नांवानें ओळखल्या जाणाऱ्या सामुदायिक संघटना शेतीच्या कामावर सरकारी नियंत्रण ठेवण्यासाठी स्थापन केलेल्या असतात, तर शेतकऱ्यांनीं स्वखुशीनें स्थापन केलेल्या सहकारी संस्थांचा उद्देश शेतकऱ्यांचें वैयक्तिक हित साधणें हा असतो. त्यादृष्टीनें विचार केला असतां, अमेरिकेंतील सहकारी संस्थांच्या प्रसाराचें मर्म लक्षांत येतें. आज सहकारी संस्था म्हणजे अमेरिकेच्या आर्थिक जीवनाचा एक प्रभावी घटक आहे. शेतीच्या सहकारी संस्था व अमेरिकन खाजगी, औद्योगिक कंपन्या यांत बरेंच साम्य आहे. शेतीच्या सहकारी संस्थांवर अनेक वैयक्तिक शेतकऱ्यांची मालकी असते. माल विकण्यासाठी किंवा गरजेच्या वस्तू खरेदी करण्यासाठी शेतकरी त्या संस्थांचा उपयोग करतात. राष्ट्रांत ज्या औद्योगिक कंपन्या असतात त्यांची मालकीहि अनेक वैयक्तिक भागिदारांकडे असते, आणि ते भागीदार त्याच औद्योगिक कंपनींत काम करीत असण्याचा संभव असतो.

अमेरिकेंतील शेतीच्या सहकारी संस्थांची वाढ इतक्या जलद गतीनें होत आहे, कीं औद्योगिक कंपन्यांना देखील त्यांची बरोबरी करणें जड वाटतें. उदाहरणार्थ, अमेरिकेंतील गहूं पिकविणाऱ्या कॅन्सास राज्यांत लॉरेन्स येथें एका सहकारी मंडळानें १ कोटी ५० लक्ष डॉलर्स किंमतीचें रासायनिक उत्पादनाचें एक यंत्र बसविलें आहे. तें यंत्र नैसर्गिक वायु, हवा व पाणी शोषून घेतें, आणि त्या घटकाचें रूपांतर दररोज ३२० टन अमोनियम नायट्रेटमध्यें व १८० टन ॲन्हायड्रस अमोनियामध्यें करतें. अमेरिकेच्या मध्यपश्चिम भागांतील शेतांना खतासाठीं या रासायनिक उत्पादनाचा उपयोग होतो.

" को-ऑपरेटिव्ह फॉर्म केमिकल्स असोसिएशन" या सहकारी संघटनेनें तें प्रचंड यंत्र उभारलें आहे. त्या संघटनेंत दोन सहकारी संस्थांचा समावेश होतो: कॅन्सास सिटी, मिसुरी, येथील " कॅंझुमर्स कोऑपरेटिव्ह असोसिएशन " आणि शिकागो, इलिनॉय, येथील " सेंट्रल फॉर्मर्स फर्टिलायझर कंपनी ". अमेरिकेंत शेतीच्या उपयोगाच्या वस्तु खरेदी करणाऱ्या ज्या मोठ्या सहकारी संस्था आहेत त्यांत "कॅंझुमर्स कोऑपरेटिव्ह असोसिएशन"चा चौथा नंबर लागतो. " सेंट्रल फॉर्मर्स फर्टिलायझर कंपनी " ही सहकारी संस्था १५ प्रादेशिक सहकारी मंडळांना खताचा पुरवठा करते, आणि तें खत शेतकरी-सभासदांना दिलें जातें. या दोन मोठ्या सहकारी संस्थांकडे त्या यंत्राची मालकी असल्यामुळें यंत्र चालू ठेवण्यास पुरेशा प्रमाणांत रासायनिक खताचें उत्पादन विकलें जाण्याची खात्री असते, आणि शेतकरी-सभासदांना पिकांसाठी हवें तेवढें रासायनिक खत मिळूं शकतें.

" अमेरिकन नॅशनल फूड्स, इंकॉर्पोरेटेड " ही अशी आणखी एक सहकारी संस्थांची संघटना आहे. त्या संघटनेंत फळें व भाज्या पिकविणाऱ्या २,००० स्थानिक सहकारी संस्था व कांहीं वैयक्तिक मळेवाले समाविष्ट आहेत. त्या संघटनेनें आपल्या कामाच्या खर्चासाठी कर्ज काढलें होतें. त्यापैकीं १८ टक्के कर्जाची, म्हणजे ७ लक्ष डॉलरची या महिन्यांत फेड झाली. कोलंबस, ओहायो येथील " फार्म ब्युरो इन्शुअरन्स कंपनीज " या आणखी एका सहकारी संस्थेनें तें कर्ज दिलें होतें.

खनिज तेलाच्या विभागांतील कांहीं शेतकऱ्यांनीं आपआपल्या जमिनींतील पेट्रोलियम काढण्यासाठी एक सहकारी संस्था काढली. कॅन्सास सिटी, मिसुरी येथील " कन्झ्यूमर्स को-ऑपरेटिव्ह असोसिएशन " या नांवानें ती संस्था आतां ओळखली जाते. ती संस्था आतां सभासदांच्या मोटरगाड्यांसाठी, मालगाड्यांसाठी व ट्रॅक्टरांसाठी तेल व पेट्रोलचा पुरवठा करते.

अमेरिकेंतील शेतावर होणाऱ्या उत्पादनाची जी सहकारी विक्री होते तींत गवळ्यांचा भाग फार मोठा असतो. सुमारें २ अब्ज, २० कोटी डॉलर किंमतीच्या मालाची विक्री गवळी-वाड्यांतून होते. हे गवळी आतां एक फार मोठी सहकारी योजना हातीं घेणार आहेत. ताज्या दुधाशिवाय इतर सर्व प्रकारच्या दुग्धजन्य पदार्थांची एकाच छापानें किरकोळ विक्री करण्यासाठी एक राष्ट्रव्यापी सहकारी संघटना स्थापन होणार आहे. त्या क्षेत्रांतील मोठमोठ्या सहकारी संघटनांशीं चढाओढ करण्याइतकी ती कार्यक्षम असेल.

अमेरिकेंतील शेतकऱ्यांच्या सहकारी संस्था अनेक वर्षें मोठ्या प्रमाणावर धंदा करीत आहेत, आणि आतां त्यांचा व्याप वाढत आहे. १९५१-५२ या हंगामाच्या सालांत, हातीं आलेल्या आंकड्यांप्रमाणें पहातां, त्यांपैकीं १०,१४३ सहकारी संस्थांनीं सुमारें ९ अब्ज, ४० कोटी डॉलरचा धंदा केला. शेतावरील उत्पादित माल एकत्र करून विकणाऱ्या सहकारी मंडळांनीं वरील रकमेपैकीं ७ अब्ज, ४० कोटी डॉलरचा व्यवहार केला. खरेदीचा व्यवहार करणाऱ्या सहकारी संस्थांनीं सभासदांसाठीं १ अब्ज, ९० कोटी डॉलर किंमतीच्या वस्तु घेतल्या. उपयुक्त कामें करणाऱ्या सहकारी संस्थांनीं ( सर्विस को-ऑपरेटिव्हज ) ११ कोटी, ४० लक्ष डॉलर किंमतीचीं कामें केलीं.

अमेरिकेंतील ग्रामीण लोकसंख्येपैकीं सुमारें ७० लक्ष लोकसंख्या कोणत्या तरी एक किंवा अधिक सहकारी संस्थांत सामील आहे. बाजारांत पाठविल्या जाणाऱ्या शेतीच्या उत्पादनापैकीं २० टक्के उत्पादनाचा सहकारी संस्थांशीं संबंध असतो, असें अमेरिकन शेती खात्याचें मत आहे.

दुसऱ्या कांहीं सहकारी संस्था उत्पादनाचा खर्च कमी करण्याविषयीं, दर ताशीं दर माणशीं उत्पादन वाढविण्याविषयीं, पुरवठ्याच्या वस्तूंच्या कमी किंमतीचा फायदा घेण्याविषयीं व बाजारांत चांगली किंमत मिळवूं शकणाऱ्या विक्रीकौशल्याविषयीं सूचना मागवून त्या सूचनांना बक्षिसें देत आहेत.

शेतीच्या सहकारी मंडळांचे पुढारी असें सांगतात कीं, शेतीच्या उत्पादनाला सरकारी पाठिंबा मिळविण्याची जरूरी राहूं नये, हा या सर्व सहकारी उपक्रमांचा उद्देश आहे. संशोधन कार्याचा भार आजवर सरकार सोशीत आलें आहे, पण तो भारहि अखेरीस शेतीच्या सहकारी संस्थांना उचलतां येईल, असें या क्षेत्रांतील जाणत्या लोकांचें म्हणणें आहे.

---

अहमदाबादमधील गलिच्छ वस्त्या—अहमदाबाद शहरांतील गलिच्छ वस्त्या सुधारण्यासाठी कॉर्पोरेशननें ७१ लाखांवर रुपये खर्च येणारी एक योजना तयार केली आहे. योजना पूर्ण करण्यासाठी मध्यवर्ती सरकारकडे आर्थिक मदत मागण्यांत येणार आहे. अहमदाबादमधील ६० लोक एका खोल्यांतून रहात आहेत.

## वाढती लोकसंख्या व अन्नाची निर्मिति

सागर येथें नॅशनल ॲकॅडमी ऑफ सायन्सेस ऑफ इंडिआ ह्या संस्थेचें अधिवेशन भरलें होतें. अधिवेशनासाठी आलेल्या शास्त्रज्ञांनीं कांहीं विषयांवर सामान्य लोकांना समजण्यासारखीं व्याख्यानें दिलीं. युनिव्हर्सिटी कॉलेज ऑफ लंडनमधील वनस्पति-शास्त्राचे प्राध्यापक मि. डब्ल्यु. एच. पीअर्सल ह्यांनीं जगांतील वाढती लोकसंख्या आणि अन्नाचें व कच्च्या मालाचें उत्पादन ह्या विषयावर भाषण केलें. ते म्हणाले कीं, लोकसंख्येच्या वाढीचा वेग व अन्नाची निर्मिती ह्यांची सांगड घालण्याचा प्रश्न हा आज महत्त्वाचा होऊन बसला आहे. चालू शतकाच्या अखेरीस जगाची लोकसंख्या हल्लीं आहे त्याच्यापेक्षा दुप्पट होईल असा अंदाज आहे, आणि तो आतां बहुतेकांना माहीत झालेला आहे. तथापि चालू शतकाच्या उरलेल्या ४५ वर्षांत अन्नाची व कच्च्या मालाची निर्मिति दुपटीनें वाढेल किंवा नाहीं ह्याविषयीं मात्र शंका आहे. माझ्या मताप्रमाणें हा प्रश्न मूलतः वनस्पतिशास्त्रांतील आहे. वनस्पतींची वाढ होणें कितपत शक्य आहे ह्या प्रश्नावर पहिल्या प्रश्नाचें उत्तर अवलंबून आहे. कारण, अन्न काय अगर कच्चा माल काय, त्यांची निर्मिति ही वनस्पतिजन्यच आहे. सूर्यापासून पृथ्वीवर जो प्रकाश पडतो त्यांपैकी सुमारें १ हजारांश इतकाच हिस्सा प्रकाश वनस्पतींच्या रूपानें साठविला जातो असा अंदाज आहे. अर्थात् वनस्पतींची वाढ करण्याचा प्रश्न सूर्याच्या प्रकाशापासून अधिक वनस्पती कशा तयार होतील अशा स्वरूपाचा होऊन बसतो. लोकसंख्येची वाढ व अन्नाची वाढ ह्यांच्यांतील व्यस्त प्रमाण शास्त्रीय शोधामुळें नाहींसें करतां येईल, असा दावा करणाऱ्या पक्षाविरुद्ध हल्लीं शास्त्रज्ञच इषारे देऊं लागले आहेत.

---

**लोकशाहीसंबंधीं वाङ्मयाचें प्रदर्शन**—अहमदाबाद येथील लॅस्की इन्स्टिट्यूट ऑफ पोलिटिकल सायन्स ह्या संस्थेनें पार्लमेंटरी पद्धतीच्या लोकशाही संबंधींच्या वाङ्मयाचें प्रदर्शन भरविलें होतें. प्रदर्शनांत ह्या विषयावरील पुस्तकें व इतर वाङ्मय मांडण्यांत आलें होतें. ब्रिटनचे मजूर पुढारी मि. ॲटली ह्यांच्याकडून सदिच्छेचा संदेश आला होता.

**मंगोलिअन-इंग्लिश शब्दकोष**—मंगोलिअन-इंग्लिश भाषेचा पहिला शब्दकोष स्टॉकहोम येथें लवकरच प्रसिद्ध करण्यांत येणार आहे. हा शब्दकोष एका स्वीडिश मिशनऱ्यानें तयार केला असून त्यांत १८,२०० शब्द आहेत. शब्दकोष तयार करण्यासाठी ग्रंथकाराला ३० वर्षें मंगोलिआंत काढावीं लागलीं.

**नवीन रेल्वे–रस्त्याची मागणी**—नैर्ऋत्य राजस्थान आणि गुजराथ ह्यांना जोडणाऱ्या रेल्वे–रस्त्याची मागणी राजस्थानमधील लोकांकडून मध्यवर्ती सरकारकडे करण्यांत येत आहे. हा संकल्पित रेल्वे–रस्ता गुजराथेमधील भिलडीपासून राजस्थानमधील राणीवाडा येथपर्यंत करण्यांत यावा असें लोकांचें म्हणणें आहे.

**भारताची इंडोनेशिआला निर्यात वाढणार**—जपाननें इंडोनेशिआला निर्यात होणाऱ्या कापडावर नियंत्रण घातल्यामुळें भारतीय कापडाची त्या देशाला होणारी कापडाची निर्यात वाढण्याचा संभव आहे, असें समजतें. इंडोनेशिआ आयात करीत असलेल्या कापडापैकीं ५० टक्के कापड जपानचें असे व ३० टक्के भारतीय असे.


# दी भारत इंडस्ट्रिअल बँक लिमिटेड

हेड ऑफिस : पुणें शहर

शाखाः—पुणें लष्कर, बारामती, लोणावळा, श्रीरामपूर (बेलापूर रोड), ओझर (जि. नाशिक) खोपोली (जि. कुलाबा)

श्री. कें. पां. जोशी (अध्यक्ष) | श्री. ह. ब. गिरमे (उपाध्यक्ष)

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. १५,४३,८१० |
| विक्री झालेलें भांडवल | रु. ७,९३,८१० |
| वसूल भांडवल | रु. ४,००,००० |
| रिझर्व्ह फंड व इतर रिझर्व्ह | रु. १,००,००० |

**एकूण खेळतें भांडवल ६० लाखांचे वर**

बँकेचे नवीन इमारतींत माफक भाड्यांत सेफ डिपॉझिट लॉकर्सची सोय केली आहे.

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

श्री. रा. बा. साळवेकर B. A., LL. B.
श्री. नी. ना. क्षीरसागर
मॅनेजिंग डायरेक्टर.



# पुणें सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लि.

— पुणें शहर —

लक्ष्मी रोड

पोस्ट बॉक्स नं. ५११ ] [ टेलिफोन नं. १४८१

भोर, पौड व वडगांव (मावळ) येथें बँकेनें आपल्या नवीन शाखा-कचेऱ्या उघडल्या आहेत. येथें व इतर शाखांतहि सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार व सहकारी सोसायट्यांना शेतीसाठीं कर्जें देणें, सोनें–चांदीचे तारणावर कर्जें देणें, वगैरे व्यवहार सुरू केले आहेत.

चालू, सेव्हिंग्ज ठेवी स्वीकारल्या जातात.

अेक ते दहा वर्षें मुदतीच्या ठेवीहि स्वीकारल्या जातात.

१ वर्ष २ टक्के, २ वर्षें २॥ टक्के, ५ वर्षें ३ टक्के, ७ वर्षें ३॥ टक्के, १० वर्षें ४ टक्के. याशिवाय रुपये २५,००० अगर पुढील रकमा ३ ते ९ महिने मुदतीनें घेण्यांत येतात.

दराबद्दल समक्ष चौकशी करावी.

वरीलप्रमाणें सर्व व्यवहार पुणें येथें मुख्य कचेरींत व इतर शाखांमध्यें होत असून त्यांसेरीज पुणें येथें सेफ डिपॉझिट व्हॉल्टस् व सेफ कस्टडीची सोय आहे. त्याचा फायदा खातेदारांनीं घ्यावा.

जास्त माहितीसाठीं लिहा अगर समक्ष भेटा.

मो. वि. रवडे,
मॅनेजिंग डायरेक्टर.


हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास', ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना), पुणें ४, येथें प्रसिद्ध केलें.